सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २१६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनहिता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालना शहरात ईस्टर संडे उत्साहात साजरा

## पहाटे ४ वाजेपासून काढण्यात आल्या भव्य प्रभात फेऱ्या





**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात ख्रिस्ती धर्मीयांचा पवित्र सण ईस्टर संण्डे मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील विविध चर्चमध्ये पहाटे ४ वाजेपासून प्रभात फेऱ्या काढण्यात आल्या होत्या नवीन जालना परिसरातील क्रांती नगर, रामनगर, ख्रिश्चन कॉलनी, ख्रिस्ती कॅम्प, कालीकुर्ती, मिशन हॉस्पिटल परिसर आदी भागातून पहाटे प्रभात फ ेऱ्या व रॅली काढण्यात आली जुना जालना भागातील नुतन वसाहत, रेल्वे स्टेशन सतकर कॉम्पलेक्स गांधी चमन येथे रॅली व प्रभात फेरी काढण्यात आली होती.यावेळी ख्रिश्चन समाजबांधवांनी हातात मेणबत्या घेवून 'प्रभु उठला आहे खचित उठला आहे अशा घोषणा दिल्या' मेणबत्यांच्या प्रकाशात परिसर झगमगत होता. यावेळी भाविकांची मोठी गर्दी दिसून आली.

ईस्टर निमित्त धर्मगुरुंनी उपदेश केला त्यांनी सांगीतले की प्रभु येशू ख्रिस्त यांचा जन्म मानवजातीच्या कल्याणासाठी झाला. त्यांनी संपूर्ण मानवजातीच्या पापांचा भार स्वतःवर घेत मानवतेच्या उद्धारासाठी वधस्तंभावर प्राण अर्पण केले. त्यांच्या मृत्यूनंतर तिसऱ्या दिवशी ते पुन्हा जिवंत झाले, या घटनेला पुनरुत्थान असे संबोधले जाते व त्यानिमित्त ईस्टर सण्डे साजरा करण्यात येतो.

मिशन हॉस्पिटल परिसरातील क्राईस्ट चर्च कॅथेड्रल येथे श्रद्धाळूंनी विशेष प्रार्थना करत बायबलचे वाचण केले. यावेळी धर्मगुरूंनी आपल्या वचनातून प्रभु येशू ख्रिस्त यांच्या जीवनकार्याची, त्यागाची आणि पुनरुत्थानाची माहिती देत पान २ वर



लग्नसराई सुरू झाली असून महिलांना लागणारे साहित्य व बांबूच्या टोपल्या व सुप फड्या खरेदी करताना. (छायाचित्र किरण खानापुरे)

जालन्यात रहस्यमय प्रकार!

# विद्युत खांबाजवळ जमिनीतून 'लाव्हा सदृश' पदार्थ बाहेर; परिसरात खळबळ

## राजपूत वाडीत नागरिकांची धास्ती; महावितरणचे पथक घटनास्थळी, तपास सुरू



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील राजपूत वाडी परिसरात आज एक रहस्यमय प्रकार समोर आला आहे. विद्युत खांबाच्या ठिकाणी जमिनीमधून लाव्हा सदृश पदार्थ बाहेर पडत असल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच काही नागरिकांनी तात्काळ महावितरणच्या अधिकाऱ्यांना कळवले. त्यानंतर महावितरणचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी विद्युत खांबावर चढून आवश्यक ती उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, नागरिकांनी जमिनीमधून बाहेर पडणारा लाव्हा सदृश पदार्थ प्रत्यक्ष पाहिल्याचा दावा केला असून, काहींनी या घटनेचे व्हिडिओ चित्रीकरणही केले आहे. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदर घटना नेमकी कशामुळे घडली, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. विद्युत गळती, रासायनिक प्रतिक्रिया किंवा अन्य कोणते कारण यामागे आहे का, याचा तपास सुरू पान २ वर

# श्रीमद् भागवत कथेच्या आयोजनात सर्वतोपरी सहकार्य-भास्कर दानवे

## हरे कृष्ण सत्संग समितीसोबत नियोजन व व्यवस्थापनाबाबत चर्चा



**जालना । प्रतिनिधी -** अधिक मासानिमित्त हरे कृष्ण सत्संग समितीच्यावतीने दि. २१ ते २७ मे दरम्यान वेदमाता गायत्री मंदिर परिसरात वृंदावन निवासी परम श्रद्धेय गौरव कृष्ण गोस्वामी यांच्या रसाळ वाणीतून आयोजित श्रीमद् भागवत कथेच्या पार्श्वभूमीवर समिती सदस्यांनी भारतीय जनता पार्टीचे महानगर अध्यक्ष तथा कथा होत असलेल्या प्रभाग १ नगरसेवक भास्कराव दानवे यांची त्यांच्या चित्रकूट निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी श्री. दानवे यांनी कथा आयोजनासाठी सर्वतोपरी सहकार्याची ग्वाही दिली.

भक्तमाल कथा प्रवक्ता किशोर तिवारी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या भेटीत श्रीमद् भागवत कथेच्या आयोजनासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. या प्रसंगी कथेसंदर्भात कार्यक्रमाचे नियोजन, व्यवस्थापन, भाविकांसाठी आवश्यक सुविधा तसेच विविध जबाबदाऱ्यांचे वाटप यावर सखोल विचारविनिमय करण्यात आला. कथा अधिकाधिक भाविकांपर्यंत पोहोचावी आणि संपूर्ण आयोजन यशस्वी व्हावे, यासाठी आवश्यक ती सर्व मदत केली जाईल, असे आश्वासन श्री. दानवे यांनी दिले. यावेळी किशोर तिवारी यांनी भगवान श्रीकृष्णांच्या दिव्य लीला, धर्म, अध्यात्म आणि जीवनमूल्यांचा प्रभावी उलगडा या कथेतून होणार असल्याचे सांगितले.

या बैठकीस सुभाषचंद्र देवीदान, अंकुशराव राऊत, अभय कुलकर्णी, मेघराज चौधरी, दीपक अंभोरे, महेश सारस्वत, पान २ वर

# कापड दुकानापुढील पर्किंगमुळे वाहतुकीचा बोजवारा

## नागरिकांचा संताप वाहतूक शाखेच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह

**जालना । प्रतिनिधी -** शहरात वाहतुकीच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असताना, शहरातील अत्यंत महत्त्वाच्या बडी सडक मार्गावर नव्याने अडथळे निर्माण होत असल्याचे समोर आले आहे. शनी मंदिर परिसरातील मूलचंद भगवानदास या कापड दुकानासमोर मोठ्या प्रमाणात वाहनांची गर्दी होत असून, यामुळे रस्ताच 'गिळंकृत' झाल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने जिल्हाभरातून नागरिक बस्ता खरेदीसाठी येथे येत आहेत. परिणामी दुकानासमोर शेकडो दुचाकी व चारचाकी वाहने उभी राहत असून, वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. या गर्दीमुळे बडी सडक परिसरात वारंवार ट्रॅफिक जाम होत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

विशेष म्हणजे, या ठिकाणी वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी नियमितपणे कार्यरत असतानाही ही समस्या कायम असल्याने त्यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. काही नागरिकांनी याबाबत तोंडी तक्रारही केल्याचे सांगितले, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

दरम्यान, या प्रकरणात नागरिकांचा संताप आणखी तीव्र होत असल्याचे दिसून येत आहे. परिसरातील काही नागरिकांशी संपर्क साधला असता, त्यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत मूलचंद भगवानदास कापड दुकानातील कर्मचारी आणि मालक यांचा वर्तन अत्यंत उद्धट असल्याचा आरोप केला आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या समस्येबाबत अनेक वेळा दुकानमालकांकडे तक्रार करण्यात आली, मात्र त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. उलट, ''संपूर्ण रस्ताच आमच्या मालकीचा आहे'' अशा स्वरूपाची भाषा वापरत नागरिकांना उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचा गंभीर आरोप काहींनी गुप्तपणे केला आहे.

या प्रकारामुळे संतप्त नागरिकांनी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशारा दिला आहे.



दरम्यान, या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी शहर वाहतूक शाखेने तात्काळ कारवाई करून रस्ता मोकळा करावा, तसेच वाहतुकीस अडथळा होणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

जर याकडे दुर्लक्ष झाले, तर जिल्हा पोलीस अधीक्षक व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार देऊन आंदोलन उभारण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

**संपादकीय** पान

## फास्टफुडमुळे वाढतोय कर्करोगाचा धोका

सध्या मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढले आहे. कॅन्सर सारख्या जीवघेण्या आणि असाध्य आजाराचे प्रमाण मुलांमध्ये वाढण्याचे कारण शोधण्यासाठी संशोधकांनी संशोधन केले. या संशोधनाचा अहवाल बमेडमध्ये प्रकाशित करण्यात आला. या अहवालात मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढण्यास फास्टफुडला जबाबदार धरण्यात आले आहे. संशोधकांनी असा दावा केला आहे की फास्टफुडमुळेच मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. हा अहवाल मुलांसह पालकांच्याही डोळ्यात अंजन घालणारा आहे. आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेतः शाळकरी मुलांना तर फस्टफ ुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. तरी लोक त्यांचे ऐकत नाही. काही वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजार होऊ शकतो हे आता संशोधनानेच सिद्ध झाले आहे त्यामुळे आतातरी पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

### पान १ वरुन

### जालना शहरात ...

श्रद्धाळूंना मार्गदर्शन केले. यावेळी शहरातील युवकांनी लेझीम पथकाच्या माध्यमातून आकर्षक सादरीकरण करत मिरवणूक काढली. विविध चर्चमधील युवक पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. मिरवणुकीची सुरुवात चर्च परिसरातून होऊन मिशन हॉस्पिटल मार्गावर तिची सांगता करण्यात आली. मार्गावर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मिरवणुकीचे स्वागत केले. मिरवणुकीदरम्यान जिवंत देखावे आणि धार्मिक नाटिका सादर करण्यात आल्या. या नाटिकांमधून येशु ख्रिस्त यांच्या जीवनातील प्रसंग, त्यांचे त्यागमय जीवन आणि मानवतेचा संदेश प्रभावीपणे सादर करण्यात आले. लेझीम पथकाच्या तालावर सादर झालेल्या कार्यक्रमांनी वातावरण अधिक उत्साहपूर्ण आणि भक्तिमय बनले. श्रद्धाळूंनी जगात शांतता, प्रेम आणि बंधुभाव टिकून राहावा यासाठी प्रार्थना केली. प्रार्थना सभेनंतर शहरात धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात जालना शहरातील ख्रिस्ती समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. महिला, पुरुष, युवक आणि लहान मुलांनीही उत्साहाने सहभाग घेतला. संपूर्ण कार्यक्रम भक्ती, आनंद आणि सामाजिक ऐक्याच्या वातावरणात पार पडला. ईस्टरच्या निमित्ताने धर्मगुरूंनी समाजात प्रेम, शांतता आणि बंधुभाव जपण्याचा संदेश दिला. इजरायल आणि इराण यांचे युद्ध थांबावे याकरीता देखील प्रार्थना केली तसेच परस्पर सहकार्य आणि मानवतेच्या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहनही त्यांनी केले. त्यामुळे जालना शहरात ईस्टर संडेचा सण धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक उत्साहात मोठ्या आनंदाने साजरा झाला.

जुना जालना येथील नुतन वसाहत येथील टॉम डॉप्सन मेमोरियल चर्च येथे सुध्दा ईस्टर निमित्त पहाटे ४ वाजेपासून प्रभात फेरी व रॅली काढण्यात आली होती यामध्ये लहान बालकांनी लेझीम सादर करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले तसेच मेणबत्यांच्या झगमगत्या प्रकाशात संपूर्ण परिसर तेजोमय व प्रसन्न झाला होता. यावेळी रेव्ह. बिभीषण कांबळे यांनी चर्च मध्ये प्रभु येशू यांच्या पुनरुत्थानावर उपदेश केला.तसेच जॉर्ज उगले यांच्यासह टॉम डॉप्सन मेमोरियल चर्च तरुण मंडळाने नुतन वसाहात येथील प्रभात फेरी व रॅली यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. एकंदरीत जालना शहरात ईस्टर सण्डे शांततेत व आनंदात साजरा झाला.

### विद्युत खांबाजवळ ...

असल्याची माहिति मिळत आहे. दरम्यान, या रहस्यमय प्रकारामुळे राजपूत वाडी परिसरातील नागरकिंमध्ये चिंतेचे वातावरण असून, संबंधित यंत्रणेकडून लवकरात लवकर वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची मागणी केली जात आहे.

### श्रीमद् भागवत ...

पवन जोशी, मनीष तावरावाला, रामेश्वर जोशी, अर्जुन बजाज, विनोद पवार, विनोद कुमावत, जयप्रकाश श्रीमाली, ललित बीजावत, सूर्यप्रकाश ओझा, दिलीप व्यास, योगेश ठक्कर, सूर्यनारायण गजबी, संतोष खंडेलवाल, मनोज दायमा, मनोज पाचफुले, कैलास चंदभनानी, सुरेश शर्मा, नारायण दायमा, विलास दळवी,भगवान दायमा आदींसह अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बदनापूर आठवडी बाजारावरुन गोंधळ वाढला





**बदनापूर । प्रतिनिधी -** शहरातील आठवडी बाजाराचा प्रश्न दिवसेंदिवस अधिकच गुंतागुंतीचा बनत असून, नियोजनातील विसंगतीमुळे व्यापारी, शेतकरी आणि नागरकिंमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

बाजारातील जागेच्या प्रश्नावरून दिवसभर वाद सुरू होते. स्थानिक व्यापाऱ्यांनी पहाटेपासून जागा निश्चित करण्याचा प्रयत्न केला, मात्र ग्रामीण व बाहेरील व्यापाऱ्यांसाठी कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याने नाराजी वाढली.

दरम्यान, कृषी उत्पन्न बाजार समिती बदनापूर यांनी जाहीर सूचनेद्वारे स्पष्ट केले की, दि. ०३-०४-२०२६ पासून आठवडी बाजार मार्केट यार्डात भरविण्यात येणार नाही.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या निर्देशानुसार गट क्र. ११० मध्ये बाजार भरविण्याचे सांगण्यात आले असून, मार्केट यार्डात दुकाने लावल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

## ''संवादातून तोडगा काढा; अन्यथा प्रश्न चिघळेल''

### ॲड. अकरमखान अब्दुलमजीदखान पठाण यांची ठाम भूमिका

शहरातील आठवडी बाजाराच्या वाढत्या गोंधळावर महाराष्ट्र मुस्लिम तेली परिषदेचे अध्यक्ष तथा प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्रचे सेक्रेटरी, समाजसेवक ॲड. अकरमखान अब्दुलमजीदखान पठाण यांनी प्रभावी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

त्यांनी म्हटले की, ''आठवडी बाजार हा केवळ व्यापाराचा विषय नाही, तर तो हजारो व्यापारी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या उपजीविकेशी थेट जोडलेला आहे. अशा महत्त्वाच्या व्यवस्थेबाबत निर्णय घेताना प्रशासनाने सर्व घटकांचा विचार करणे गरजेचे होते. दुर्दैवाने, सध्याच्या परिस्थितीत नियोजनाअभावी गोंधळ निर्माण झाला असून याचा सर्वाधिक फटका लहान व्यापारी आणि शेतकऱ्यांना बसत आहे.''

ते पुढे म्हणाले, ''स्थानिक व्यापारी, ग्रामीण भागातून येणारे विक्रेते आणि शेतकरी यांच्यासाठी स्पष्ट आणि न्याय्य जागावाटप होणे अत्यावश्यक आहे. एका भागाला प्राधान्य देऊन दुसऱ्यांवर अन्याय होणे ही योग्य भूमिका नाही. प्रशासनाने सर्वांना समान संधी देणारी पारदर्शक व्यवस्था निर्माण केली पाहिजे.''

नागरिकांच्या विरोधाबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले,

''रहिवासी भागात बाजार भरविल्यास नागरिकांना होणाऱ्या त्रासाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. वाहतूक कोंडी, स्वच्छतेचा प्रश्न आणि सुरक्षेच्या बाबी या अत्यंत गंभीर आहेत. त्यामुळे नागरिकांच्या भावना आणि अडचणी समजून घेऊन योग्य पर्याय शोधणे आवश्यक आहे.''

शेवटी त्यांनी प्रशासनाला ठोस आवाहन करत म्हटले, ''हा प्रश्न वादाने नव्हे तर संवादाने सुटू शकतो. प्रशासन, व्यापारी, शेतकरी आणि नागरिक यांच्यात समन्वय साधून कायमस्वरूपी आणि सर्वांना न्याय देणारा निर्णय घ्यावा. अन्यथा हा प्रश्न पुढे अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.''त्यांच्या या संतुलित भूमिकेमुळे आठवडी बाजाराच्या प्रश्नावर सर्वसमावेशक आणि न्याय्य तोडगा निघण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

नगर पंचायत बदनापूरकडूनही नवीन ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. त्यानुसार बालाजी मंदिर, बालाजी गल्ली, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नागोरी यांच्या घरापर्यंत तसेच गणेशनगर, पवार गल्ली, गणपती गल्ली, माळी गल्ली, ज-हाड गल्ली आणि होळकर चौक परिसरात बाजार भरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भाजीपाला व इतर दुकाने या भागात, तर मांस विक्रीसाठी खाटीक मोहल्ल्याच्या मागील परिसर निश्चित करण्यात आला आहे. तसेच जालनाऔरंगाबाद हायवे व अकोला रोडवर दुकाने लावण्यास बंदी घालण्यात आली आहे.

मात्र, या निर्णयाविरोधात नागरिकांनी तीव्र आक्षेप नोंदविला आहे. दिनांक ०२-०४-२०२६ रोजी मुख्याधिकारी, नगरपंचायत बदनापूर यांना दिलेल्या निवेदनात नागरिकांनी स्पष्ट नमूद केले आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, माळी गल्ली, गणपती गल्ली व पवार गल्ली हे पूर्णतः रहिवासी व अरुंद रस्त्यांचे भाग असून येथे आठवडी बाजार भरविल्यास वाहतुकीस अडथळा निर्माण होईल.

निवेदनात पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, बाजारामुळे केरकचरा साचून दुर्गंधी निर्माण होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे रोगराई वाढू शकते. तसेच गर्दीमुळे चोरीच्या घटनांमध्येही वाढ होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

नागरिकांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले आहे की, बाजार अन्यत्र स्थलांतरित न केल्यास या भागात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो आणि त्यास पूर्णतः नगर पंचायत प्रशासन जबाबदार राहील.

एकीकडे प्रशासनाचे आदेश आणि दुसरीकडे नागरिकांचा तीव्र विरोध, यामुळे बदनापूरचा आठवडी बाजार सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकला असून, या प्रश्नावर तोडगा काढणे प्रशासनासमोर मोठे आव्हान ठरत आहे.

### जालना पोलिसांची मोठी कारवाई

# ११ महिन्यांपासून फरार असलेला खुनाचा आरोपी जेरबंद; चोरीची मोटारसायकलही जप्त

**जालना -** शहरातील सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या एका खून प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला () यश आले आहे. गेल्या ११ महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देणारा हा आरोपी केवळ पकडलाच गेला नाही, तर त्याच्याकडून चोरीची एक मोटारसायकल देखील जप्त करण्यात आली आहे.

९ मे २०२५ रोजी संजयनगर (जुना जालना) येथील रहिवासी सरला उमेश इंचे यांच्या फिर्यादीवरून सदर बाजार पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा ( कलम १०३, १०९(१) इ.) दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील आरोपी संतोष बंडू भिसे (रा. प्रशांतीनगर, जालना) हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांनी या फरार आरोपीचा शोध घेण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना दिले होते.

फरार संतोष भिसे याचा शोध घेत असताना, एलसीबीच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, आरोपी सिंदखेडराजा मार्गे जालना शहरात येणार आहे. या माहितीवरून पथकाने जालना-सिंदखेडराजा रोडवरील न्हावा गावाजवळ सापळा रचला. संशयास्पद रित्या मोटारसायकलवर येत असताना पोलिसांनी त्याला अडवून ताब्यात घेतले.

आरोपीकडे असलेल्या मोटारसायकलच्या कागदपत्रांबाबत विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच त्याने कबुली दिली की, ही मोटारसायकल त्याने ११ महिन्यांपूर्वी मंठा येथील एका मंगल कार्यालयासमोरून चोरली होती. मंठा पोलीस ठाण्यातील रेकॉर्ड तपासले असता, तेथे मोटारसायकल चोरीचा गुन्हा (गु.र.न. २७७/२०२५) दाखल असल्याचे निष्पन्न झाले. ६५,००० रुपये किमतीची चोरीची मोटारसायकल पोलिसांनी जप्त केली आहे.



ही महत्त्वाची कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रमेश राठोड, गोपाल गोशिक आणि रमेश काळे यांचा समावेश होता. आरोपी संतोष भिसे याला पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी सदर बाजार पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. ११ महिन्यांपासून फरार असलेल्या गुन्हेगाराला अटक केल्यामुळे पोलीस दलाचे कौतुक होत आहे.

# हनुमान मंदिरातील दानपेटी फोडणारा चोरटा तासाभरात गजाआड

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील मंमादेवी नगर भागातील श्री समर्थ हनुमान मंदिरातील दानपेटी फोडून रोख रक्कम लंपास करणाऱ्या अट्टल चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेने () अवघ्या एका तासात बेड्या ठोकल्या आहेत. सागर संतोष कांबळे (वय २६, रा. भक्तेश्वर नगर, जालना) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

**घटनेचा थरार आणि गुन्हा दाखल**

मिळालेल्या माहितीनुसार, ३ एप्रिल २०२६ रोजी फिर्यादी संभाजी गणेश एलगंडे (वय ३८, रा. मंमादेवीनगर, जालना) यांनी कदिम जालना पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. २ एप्रिलच्या मध्यरात्री ११:५४ ते ३ एप्रिलच्या पहाटे ६:०० वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने मंमादेवी नगर येथील श्री समर्थ हनुमान मंदिराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने मंदिरातील स्टीलची दानपेटी फोडून त्यातील सुमारे ६,००० रुपये चोरून नेले होते. या तक्रारीवरून कदिम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १३९/२०२६, भारतीय न्याय संहिता () कलम ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

**पोलीस अधीक्षकांचे आदेश आणि एलसीबीची तत्परता**

मंदिरातील चोरीच्या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण होते. घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना तात्काळ तपासाचे आणि आरोपीला जेरबंद करण्याचे आदेश दिले.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आपल्या गोपनीय माहितीदारांचे जाळे सक्रिय केले. अवघ्या काही वेळातच माहिती मिळाली की, भक्तेश्वर नगरमधील सागर कांबळे याने ही चोरी केली असून तो पळून जाण्याच्या तयारीत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी सतकर कॉम्प्लेक्स परिसरातील कल्पना हॉटेलजवळ सापळा रचून सागरला ताब्यात घेतले.

पोलिसी खाक्या दाखवताच कबुली: सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या सागरला जेव्हा पोलिसांनी विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली, तेव्हा त्याने मंदिरातील चोरीची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीच्या रकमेपैकी १,३३२ रुपये जप्त केले असून पुढील तपासासाठी त्याला कदिम जालना पोलिसांच्या हवाली केले आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली खालील पथकाने केली: पोलीस निरीक्षक पंकज जाधव. अधिकारी: सपोनि सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ. रामप्रसाद पव्हरे, भाऊराव गायके, शाम्युअल कांबळे, प्रभाकर वाघ, संदीप चिंचोले, रमेश राठोड, रमेश काळे, संजय सोनवणे, अशोक जाधवर आणि सागर बाविस्कर यांनी कारवाई केली. गुन्हा दाखल झाल्यापासून अवघ्या एका तासात आरोपीला अटक केल्यामुळे जालना पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# प्रभाग क्रमांक ९ मध्ये विकासकामांना गती

## महावीर ढाका, विक्रांत ढाका आणि मंगला गरदास यांचे नागरिकांच्या प्रश्नांवर विशेष लक्ष

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील प्रभाग क्रमांक ९ मध्ये विकासकामांना वेग आला असून, स्थानिक नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी येथील लोकप्रतनिधिी महावीर ढाका, विक्रांत ढाका आणि नगरसेविका मंगला गरदास हे सातत्याने कार्यरत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. निवडणुकीनंतर प्रभागातील विविध भागांमध्ये विकास, स्वच्छता, धार्मिक वातावरण आणि नागरिकांच्या सुविधांवर भर देत तिन्ही नगरसेवकांनी आपली वेगळी छाप निर्माण केली आहे.

प्रभाग क्रमांक ९ मध्ये येणाऱ्या नरिमन नगर, सोनल नगर, मधुबन कॉलनी, डबल जिम परिसर, घायाळ नगर तसेच इतर भागांमध्ये अनेक लहान-मोठ्या समस्या नागरिकांना भेडसावत होत्या. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, प्रकाशव्यवस्था, नालेसफाई, धार्मिक व सामाजिक उपक्रमांसाठी आवश्यक सुविधा यांसारख्या प्रश्नांवर या तिन्ही नगरसेवकांनी गांभीर्याने लक्ष केंद्रित केले आहे.

महावीर ढाका यांनी निर्माण केले भक्तिमय वातावरण

प्रभागातील सामाजिक आणि धार्मिक एकात्मतेला चालना देण्यासाठी महावीर ढाका यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. त्यांच्या प्रयत्नांतून श्रीराम-हनुमान धार्मिक मंदिर उभारणीचे काम विविध भागांत सुरू करण्यात आले असून, यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. या धार्मिक उपक्रमामुळे स्थानिक नागरकिांमध्ये एकोपा वाढण्यास मदत झाली असून, परिसरातील ज्येष्ठ, महिला आणि युवक वर्गातूनही या कामाचे स्वागत करण्यात येत आहे.

धार्मिक स्थळांच्या उभारणीमुळे केवळ श्रद्धेचे केंद्र निर्माण झाले नाही, तर सामाजिक संवाद आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठीही एक व्यासपीठ उपलब्ध होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. यामुळे प्रभाग क्रमांक ९ मध्ये सकारात्मक आणि संस्कारक्षम वातावरण तयार होत असल्याचे दिसून येत आहे.

विक्रांत ढाका यांची विकासकामांत सक्रिय भूमिका

प्रभागातील विकासकामे वेळेत पूर्ण व्हावीत, नागरिकांच्या तक्रारी तातडीने निकाली निघाव्यात आणि प्रशासनाशी समन्वय राखून कामे पुढे जावीत यासाठी विक्रांत ढाका हे देखील सक्रियपणे काम करत आहेत. प्रभागातील अंतर्गत रस्ते, गटारी, स्वच्छता मोहीम, तसेच दैनंदिन नागरी सुविधांच्या उभारणीत त्यांचा सहभाग महत्त्वाचा मानला जात आहे.

स्थानिक नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या संबंधित विभागांपर्यंत पोहोचवून त्यावर कार्यवाही करून घेणे, ही त्यांची कार्यशैली असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

नगरसेविका मंगला गरदास यांचे महिलांच्या व सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर लक्ष

नगरसेविका मंगला गरदास यांनी विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य कुटुंबांच्या दैनंदिन अडचणींकडे लक्ष देत विकासाचा समतोल दृष्टिकोन ठेवला आहे. प्रभागातील मूलभूत नागरी सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असून, नागरिकांच्या छोट्या-छोट्या समस्या देखील प्राधान्याने सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत.

विशेषतः पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्त्यांची दुरुस्ती, दिवाबत्ती, नालेसफाई आणि सुरक्षित वातावरण यांसारख्या मुद्द्यांवर त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यामुळे प्रभागातील महिलांमध्ये आणि कुटुंबांमध्ये त्यांच्याविषयी वश्विास निर्माण झाला आहे.

निवडणुकीनंतर दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याचा प्रयत्न

निवडणुकीदरम्यान नागरिकांना दिलेली आश्वासने केवळ घोषणांपुरती न ठेवता, प्रत्यक्षात विकासकामांतून त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न महावीर ढाका, विक्रांत ढाका आणि मंगला गरदास हे करत असल्याचे प्रभागातील नागरिक सांगत आहेत.

प्रभागातील विविध भागांमध्ये लोकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यावर त्वरीत उपाययोजना करण्यासाठी तिन्ही नगरसेवक सातत्याने फिरतीवर असतात. त्यामुळे ''जनतेच्या सेवेसाठी तत्पर लोकप्रतिनिधी'' अशी त्यांची ओळख निर्माण होत आहे.

नागरकिंमध्ये समाधानाचे वातावरण

प्रभाग क्रमांक ९ मधील विकासकामे, धार्मिक आणि सामाजिक उपक्रम, तसेच नागरिकांच्या प्रश्नांवर होत असलेले काम पाहता स्थानिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी काळातही या तिन्ही नगरसेवकांनी विकासाचा वेग कायम ठेवून प्रभागाला अधिक सक्षम आणि आदर्श बनवावे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# बांधकाम व्यावसायिक सावधान! प्रकल्प खर्चावर ठरणार पर्यावरण नुकसान भरपाई - सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

पर्यावरण नियमांचे उल्लंघन करून भव्य बांधकाम प्रकल्प उभारणाऱ्या विकासकांना सर्वोच्च न्यायालयाने एक मोठा दणका दिला आहे. एका महत्त्वपूर्ण निकालात, न्यायालयाने स्पष्ट केले आहे की पर्यावरणविषयक नियमांचे उल्लंघन केल्यास होणारी नुकसान भरपाई ठरवण्यासाठी विकासकाच्या प्रकल्पाचा एकूण खर्च किंवा उलाढाल हा एक महत्त्वाचा आधार मानला जाऊ शकतो. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाला या आधारावर मोठी नुकसान भरपाई लावण्याचा पूर्ण अधिकार आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. पुणे येथील दोन मोठ्या बांधकाम कंपन्या, मे. रिदम काउंटी आणि मे. की स्टोन प्रॉपर्टीज, यांच्या याचिका फेटाळताना न्यायालयाने हा ऐतिहासिक निर्णय दिला.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी आहे की, पुणे येथील या दोन्ही बांधकाम व्यावसायिकांनी आवश्यक पर्यावरण मंजुरी न घेता किंवा नियमांचे उल्लंघन करून बांधकाम सुरू ठेवले होते. याविरोधात स्थानिक रहिवाशांनी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे धाव घेतली होती. एनजीटीने या दोन्ही प्रकरणांमध्ये सखोल चौकशी करून प्रदूषक भरेल या तत्त्वाचा वापर करत मे. रिदम काउंटीला ५ कोटी रुपये आणि मे. की स्टोन प्रॉपर्टीजला ४.४७ कोटी रुपयांची जबर नुकसान भरपाई भरण्याचे आदेश दिले होते. एनजीटीच्या या निर्णयाला दोन्ही विकासकांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

विकासकांनी न्यायालयात असा युक्तिवाद केला की, प्रकल्प खर्चाच्या आधारावर नुकसान भरपाई ठरवण्यासाठी कोणताही विशिष्ट कायदा किंवा निश्चित सूत्र नाही. त्यामुळे एनजीटीने लावलेली भरपाई अवाजवी आणि बेकायदेशीर आहे. मात्र, न्यायमूर्ती दिपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने हा युक्तिवाद पूर्णपणे फेटाळून लावला. न्यायालयाने म्हटले की, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण कायदा, २०१० च्या कलम १५ आणि २० अंतर्गत एनजीटीला पर्यावरणाचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी आणि दोषींवर कारवाई करण्यासाठी व्यापक अधिकार दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात अधोरेखित केले की, एखाद्या प्रकल्पाचा आकार जेवढा मोठा असतो, तेवढाच त्याचा पर्यावरणावर होणारा परिणामही मोठा असतो. मोठ्या प्रकल्पातून विकासक मोठा नफा कमावतात, त्यामुळे पर्यावरणाची हानी झाल्यास त्याची जबाबदारीही त्यांनी त्याच प्रमाणात उचलली पाहिजे. त्यामुळे प्रकल्पाचा खर्च किंवा उलाढाल हा नुकसान भरपाई ठरवण्यासाठी एक तर्कसंगत आणि योग्य मापदंड आहे. न्यायालयाने गोयल गंगा डेव्हलपर्स प्रकरणाचा दाखला दिला, ज्यात प्रकल्प खर्चाच्या ५% ते १०% पर्यंत नुकसान भरपाई लावण्यात आली होती.

या निकालावर प्रतिक्रिया देताना एका निवृत्त न्यायमूर्तींनी सांगितले, ''हा निकाल म्हणजे पर्यावरण कायद्याच्या अंमलबजावणीतील एक मैलाचा दगड आहे. आतापर्यंत किरकोळ दंड भरून मोठे विकासक सहज सुटत होते. परंतु आता प्रकल्प जितका मोठा, तितकी जबाबदारी मोठी, हा संदेश या निकालाने दिला आहे. यामुळे विकासकांमध्ये कायद्याचा धाक निर्माण होईल आणि ते पर्यावरण नियमांचे पालन करण्यास अधिक गंभीर होतील.''

नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी या निकालाचे स्वागत केले आहे. ते म्हणाले, ''सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय बांधकाम क्षेत्रासाठी एक धोक्याची घंटा आहे. केवळ कागदोपत्री पूर्तता करून चालणार नाही, तर पर्यावरणाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे. विकासकांनी प्रकल्प सुरू करण्यापूर्वी सर्व परवानग्या घेतल्या पाहिजेत आणि नियमांचे उल्लंघन केल्यास होणाऱ्या गंभीर आर्थिक परिणामांची जाणीव ठेवावी. हा निकाल प्रदूषक भरेल या तत्त्वाला खऱ्या अर्थाने बळकटी देतो आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी उचललेले एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे.''

या प्रकरणात, रिदम काउंटीच्या ३३५ कोटी रुपयांच्या प्रकल्पावर लावलेली ५ कोटी रुपयांची भरपाई ही केवळ १.४९% आहे, तर की स्टोनच्या ७६ कोटी रुपयांच्या प्रकल्पावर लावलेली ४.४७ कोटी रुपयांची भरपाई सुमारे ५.८८% आहे, जी न्यायालयाने पूर्णपणे वाजवी ठरवली. न्यायालयाने स्पष्ट केले की, एनजीटीने तज्ज्ञांच्या समितीच्या अहवालाचा आणि उपलब्ध पुराव्यांचा योग्य विचार करूनच हा निर्णय दिला आहे आणि त्यात कोणताही कायदेशीर दोष नाही. अखेरीस, सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही विकासकांच्या याचिका फेटाळून लावल्या आणि एनजीटीचा निर्णय कायम ठेवला. तसेच, नुकसान भरपाईची रक्कम भरण्यासाठी विकासकांना तीन महिन्यांची मुदत दिली आहे.

या निकालामुळे देशभरातील मोठ्या प्रकल्पांना आता पर्यावरण नियमांकडे दुर्लक्ष करणे महागात पडणार आहे, हे निश्चित झाले आहे.



# अखिल मानव जात एकाच माता-पित्याची लेकरे : सर्वांनी गुण्यागोविंदाने नांदावे

## शेख नसीर यांचे प्रतिपादन

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** अखिल मानव जात ही एकाच माता पित्याची संतान असून त्या अर्थाने आम्ही सर्व जण एकमेकांचे बांधव आहोत. म्हणून तर कोणत्याही धर्माच्या व्यक्तीचे रक्त कोणत्याही धर्मातील व्यक्तीला चालते. यासाठी आपसी भेदभाव विसरून प्रत्येकाने गुण्यागोविंदाने नांदावे.संपूर्ण विश्वाचा निर्माता एकच ईश्वर आहे. पवित्र धर्मग्रंथ कुराण आणि प्रेषित मोहम्मद यांची जीवनी यात संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचे मार्ग दडलेले आहे. रमजान महिन्याचे उपवास आला गरीबाची भूक व तहानेची जाणीव करून देतात. ईद चा सण व ईद मिलन सारख्या कार्यक्रमातून आमच्या राष्ट्रीय एकतेला आणखी बळकटी मिळते. आमच्या देशात द्वेषाचा नव्हे तर प्रेमाचा संदेश देऊन बंधुभाव कायम ठेवण्यासाठी सर्वधर्मीय समाज बांधवांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. असे विचार छत्रपती संभाजी नगर येथील जमात ए इस्लामी हिंदच्या सद्भावना मंचचे विभागीय प्रमुख शेख नसीर यांनी व्यक्त केले. जमात ए इस्लामी हिंद तर्फे शुक्रवारी जाफराबाद येथे आयोजित ईद मिलन कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी त्यांनी संत तुकाराम महाराज, कवयित्री बहिणाबाई चौधरी आदींच्या मानवतावादी विचारांचाही उल्लेख करीत सर्वांनी संत महंताच्या सद्भावना तत्वाचा अंगीकार करावा असेही म्हटले. यावेळी मंचावर जाफराबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सतीश जाधव, एडवोकेट वि.भा. काष्टे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सब इन्स्पेक्टर रमेश विठोरे, टीव्ही सिरीयल निदेशक डॉ. पी.जी. देशमुख, फुले शाहू आंबेडकर विचाराचे विचारवंत दिनकर ससाने, शिक्षक पतसंस्थेचे सचिव वसंत शेवाळे, जाफराबादचे नकाराध्यक्ष दीपक वाकडे, काँग्रेस नेते सुरेश गवळी, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हबीब ऐद्रुस चाऊस, केंद्रप्रमुख एस. आर. फोलाने, सामाजिक कार्यकर्ते कदीरबाबा शेख आदींची विशेष उपस्थिती होती. यावेळी सतीश जाधव, ॲडव्होकेट काष्टे, दिनकर ससाने, डॉ. पी.जी. देशमुख, रमेश विटोरे, वसंत शेवाळे आदींनी सद्भावना या विषयावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचा प्रारंभ जमातचे जाफराबाद अध्यक्ष मुमताज पठाण यांच्या कुराण पठणाने करण्यात आला. सूत्रसंचालन मुमताज पठाण यांनी केले तर आभार नसीम शेख यांनी मानले. यावेळी उपस्थित सर्वांसाठी शीरखुर्मा पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी जमात चे ताहेर काझी, इकबाल खान, नगरसेवक तालिब खान, युनूस खान, इद्रीस खान, अब्दुल मजीद, आदींसह युथविंग, एसआयओ व जमात ए इस्लामी हिंदच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. फोटो - जाफराबाद येथे आयोजित ईद मिलन कार्यक्रमात सद्भावना या विषयावर मार्गदर्शन करताना सद्भावना मंचचे शेख नासेर.




# टेंभुर्णीच्या भूमिपुत्राला अजून एक पुरस्कार

## दिव्यांग आकाश ला मुंबई येथे पुरस्कार देऊन सन्मान




**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील भूमिपुत्र आकाश देशमुख यांना या वर्षीचा ''महाराष्ट्र कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान'' व ''मराठी इंडी म्युझिक अवॉर्ड्स'' २०२६ चा पुरस्कार सोहळा गुरुवार २ एप्रिल रोजी ''स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृह'', दादर (प) मुंबई येथे देऊन गौरव करण्यात आला. आकाश यांना जरी चालता येत नाही बोलता येत नाही तरी पण प्रत्येक प्रसंगाचा भाव तो खूप योग्य प्रमाणे हाताळून त्यांचे मांडणी उत्तम करून एक आदर्श कवी झालेले असून या अगोदर त्यांना अनेक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले आहे. पुरस्कार घेता वेळी त्यांचे वडील त्यांचा सोबत होते.

महाराष्ट्रचे माहिती तंत्रज्ञान () आणि सांस्कृतिक कार्य मंत्री मा.श्री आशिष शेलार काही कारणास्तव कार्यक्रमास उपस्थित न राहू शकल्याने मला अजय नाईक सरांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट दिव्यांग कलाकार पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले आहे माझी या पुरस्कारासाठी निवड केल्याबद्दल अजय नाईक सर व संपूर्ण टीमचे खूप खूप आभार मानून धन्यवाद दिले. कवी आकाश देशमुख यांना भेटलेल्या या पुरस्कार मुळे तुमचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# 'शुद्ध अंत:करणाने केलेल्या, भगवंताच्या नामस्मरणाने मृत्यूला ही माघार घ्यावी लागते'



**जालना । प्रतिनिधी -** प्रत्येकाचा मृत्यू अटळ आहे, माणसा कडे किती ही धन दौलत असू द्या, त्याला आपला मृत्यू टाळता येत परंतु शुद्ध अंत:करणाने केलेल्या भगवंताच्या नामस्मरणाने, मृत्यूला ही माघार घ्यावी लागते असे भागवताचार्य ह्भप सोपान महाराज सानप यांनी कीर्तनातून बोलतांना सांगितले ते घनसावंगी तालुक्यातील श्रीक्षेत्र हनुमाननगर रवना येथे वैराग्यमुर्ती वै. सद्गुरु जयराम बाबा भोसले यांचा फिरता पुण्यस्मरण सोहळ्याच्या आयोजित कीर्तनात बोलत होते..पुढे बोलतांना महाराज म्हणाले की कीर्तनकारांनी जे श्रोत्यांच्या कल्याणाचे आहे तेच कीर्तनात मांडले पाहिजे,आपले स्वतःचे मत कधी मांडू नये. ज्यांनी पंचवेद गाथा लिहला त्यांनी कधी आपले मत मांडले नाही, प्रत्येक माणसाला भोग आणि मोक्ष देण्याची ताकद ही भगवंताच्या नामस्मरणात आहे, वैकुंठाची प्राप्ती करायची असेल तर भगवंताचे नामस्मरण करा, नरदेह हा नाशिवंत आहे. परंतु मृत्यूनंतर ही प्राण्यांच्या अवयव कोणत्या ना कोणत्या कमी पडतात,तसे नरदेह हा कोणत्याच कामी येत नाही,माणसाचे शरीर हे अमंगळ व अपवित्र आहे, जो भगवंताचे नामस्मरण कधीच करत नाही त्याचे शरीर अमंगळ असते,भगवंताचे नामस्मरण करा, देह पवित्र होतो, इतर क्षेत्रात खूप मोठे कलाकार गायक आहेत त्यांच्या गायनाची कला पाहून लोक त्यांच्यासोबत फोटो काढतात परंतु जे भगवंताच्या नामस्मरणाचे गायन करतात त्यांचे लोक दर्शन घेतात इतर ठिकाणी प्राण्यांचा लोक वापर करतात परंतु त्यांचे कधी ही दर्शन घेत नाहीत ज्ञानोबारायाच्या पालखीला असलेल्या बैलांचे व घोड्यांचे लोक दर्शन घेतात, कारण त्यांचा देह संतांच्या संगतीने पवित्र झालेला असतो, असे महाराजांनी कीर्तनातून बोलताना सांगितले या भव्य दिव्य सोहळ्यास वै. सद्गुरु जयराम महाराज भोसले बाबा यांचे महाराष्ट्रातील अनेक गावावरून आलेले शिष्यमंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# रुपयांची समस्या या प्रबंधातील शिफारशीमुळे भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना - प्रो.डॉ.सुनील मेढे

**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त व्याख्यानरुपी दुसरे पुष्प गुंफण्यात आले. महाविद्यालयाच्या राजर्षी शाहू महाराज सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुलजी म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली एमहाविद्यालयाचे प्रो. डॉ.सुनील मेढे यांचे व्याख्यान आयोजित करून दुसरे पुष्प गुंफले , या वेळी वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. श्याम सर्जे यांची प्रमुख उपस्थिती होती प्रमुख वक्ते प्रो. डॉ.सुनील मेढे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर लिखित द प्रॉब्लेम ऑफ रुपीज इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्युशन हा प्रबंध १९२१ मध्ये डी एस्सी पदवी संपादन करण्यासाठी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या विद्यापीठात सादर केला होता त्यावेळी प्रबंधाचे मूल्यमापन आणि परीक्षण हेरॉल्ड लास्की यांच्यासह सहा नामवंत अर्थशास्त्रज्ञांनी मूल्यमापन केले व काही सूचना दिल्या त्यावेळी बाबासाहेबांनी त्यांच्या सूचनेच्या अनुषंगाने थोडी भाषा बदल करून तो प्रबंध पुन्हा सादर केला त्यावेळी बाबासाहेबांचे वय अवघे ३२ वर्षे होते यावरून असे जाणवते की अगदी कमी वयातही बाबासाहेबांचे अर्थशास्त्र विषयावर कसे प्रभुत्व होते हे सिद्ध होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे विद्यार्थी होते त्यांनी कोलंबिया विद्यापीठातून पीएच डी पदवीसाठी ॲडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी हा विषय निवडला तर पीएचडी साठी नॅशनल डिव्हीडंट ऑफ इंडिया हिस्टॉरिकल अँड अन्यालिटीकल स्टडी हा विषय निवडला होता जून १९२१ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना पीएचडी पदवी बहाल करण्यात आली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चार प्रबंध लिहिले परंतु प्रॉब्लेम ऑफ रुपी हा प्रबंध जास्त वादग्रस्त ठरला कारण या प्रबंधामध्ये मोघलांच्या काळापासून ते ब्रिटिशांच्या काळापर्यंत कोणते चलन कसे वापरले याचा उहापोह केला आहे भारतीय रुपयात बदलाच्या वेळी काय प्रयोजन होते व काय परिणाम झाले याचेही विश्लेषण करण्यात आले आहे. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुलजी म्हस्के यांनी भारतीय रुपया आणि विदेशी चलन याची तुलना केली तसेच आज जागतिक बाजारपेठेमध्ये अमेरिकन डॉलरची कशी मक्तेदारी आहे व का आहे? याचे सविस्तर विवेचन केले. भविष्यात भारताने पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून परकीय चलन आपल्या देशात जास्तीत जास्त कसे येईल अशा धोरणाचा स्वीकार करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस.एम.पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.ए.आर. ढवळे यांनी मानले या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रसिद्धी प्रमुख प्रा अनिल वैद्य यांचीही उपस्थिती होती.व

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.




## परतूरात शिवसेनेला नवी धार

# शरद भारुका यांच्याकडे शहर प्रमुखपदाची धुरा

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरातील राजकीय घडामोडींना नवे वळण देणारी महत्त्वाची नियुक्ती जाहीर झाली असून, शिवसेना (शिंदे गट) शहर प्रमुखपदी शरद शिवकुमार भारुका यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना उपनेते, माजी मंत्री अर्जुनराव खोतकर ,भास्करराव अंबेकर पंडीतराव भूतेकर

जालना जिल्हा शिवसेना प्रमुख ए. जे. पाटील बोराडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देत भारुका यांच्या खांद्यावर शहर संघटनेची महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. या प्रसंगी तालुका प्रमुख सुदर्शन बप्पा सोळके याची ही उपस्थिती होती या नियुक्तीमुळे परतूर शहरात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक बळकट होणार असल्याचा वश्विास व्यक्त केला जात आहे.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारधारेतून प्रेरित होऊन, तसेच शिवसेना सचिव संजय मोरे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली भारुका यांची निवड करण्यात आली आहे. शहराचा सर्वांगीण विकास साधणे, तळागाळातील नागरिकांपर्यंत पक्षाची ध्येयधोरणे पोहोचवणे आणि संघटन अधिक सक्षम करणे या उद्देशाने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

शरद भारुका यांच्या निवडीची माहिती मिळताच परतूर शहरातील शिवसैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करत उत्साह व्यक्त केला. जनसंपर्क आणि संघटनात्मक कार्यातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव लक्षात घेता, त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाला नवी उभारी मिळेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

या निवडीबद्दल जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे, तालुका प्रमुख सुदर्शन बप्पा सोळके तसेच स्थानिक पदाधिकारी आणि समर्थकांनी भारुका यांचे अभिनंदन केले असून, आगामी काळात ते पक्षविस्तारासाठी जोमाने काम करतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



# राहुरी विधानसभेसाठी महाविकास आघाडीकडून कोण लढणार? तिढा कायम

**राहुरी -** राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी निवडणूक पार पडणार आहे. एकीकडे भाजपने अक्षय कर्डीले यांची उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी आपली भूमिका स्पष्ट न केल्याने मविआतील संभ्रम कायम आहे. महाविकास आघाडीत राहुरी विधानसभेचा तिढा अद्याप कायम आहे. राहुरी विधानसभेची पोटनिवडणुकसाठी मविआ चा उमेदवार कोण? याबाबत शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या नेत्यांची पक्षकार्यालयात बैठक सुरु आहे. दरम्यान, राहुल विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी माजी आमदार प्राजक्त तनपूरे हे इच्छुक आहेत. तसा त्यांनी प्रचार देखील सुरु केला आहे. काँग्रेसकडून ही उमेदवारी देण्याची तयारी सुरु आहे. तर ठाकरेंच्या शिवसेनेकडून ही इच्छुक उमेदवार मातोश्रीवर भेट देऊन गेले आहेत. त्यामुळं नेमका या ठिकाणी महाविकास आघाडीचा उमेदवार कोण? याचा तिढा कायम आहे. सध्या राष्ट्रवादी (शरद पवार गट) कार्यालयात प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड यांची बैठक सुरू आहे. या बैठकीला सुप्रिया सुळे ही उपस्थित राहण्याची शक्यता आहे. प्राजक्त तनपुरे हे राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीत नेमके कोणत्या पक्षातून निवडणूक लढणार? याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

शनिवारी अहिल्यानगरच्या राष्ट्रवादी भवनात झालेल्या पदाधिकारी बैठकीला प्राजक्त तनपुरे उपस्थित राहिले नाहीत, त्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. सोबतच तनपुरे हे अपक्ष उमेदवारी करतील अशी मतदारसंघात चर्चा सुरू आहे, त्या चर्चेला पदाधिकारी बैठकीत त्यांच्या अनुपस्थितीने बळ मिळाले आहे. बैठकीनंतर राष्ट्रवादीचे खासदार निलेश लंके यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना, ''मी तनपुरे यांच्या संपर्कात आहे, योग्य वेळी योग्य डाव टाकू'' असं म्हंटलं आहे. मात्र तनपुरे यांनी वेगळा निर्णय घेतल्यास ठाकरे गट आणि काँग्रेस निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याने राहुरीत महाविकास आघाडीत बिघाडी होणार का? अशी राजकिय चर्चा सुरू झाली आहे. संभाव्य उमेदवार / फिक्स उमेदवार भाजप-अक्षय कर्डीले, भाजप राष्ट्रवादी / अपक्ष - प्राजक्त तनपुरे शिवसेना ठाकरे- रावसाहेब खेवरे , माजी जिल्हा प्रमुख काँग्रेस - बाळासाहेब आढाव , तालुका अध्यक्ष / साहेबराव म्हसे, माजी बाजार समिती सदस्य एआयएमआयएम - डॉ.परवेज असरफी, जिल्हा अध्यक्ष अपक्ष- गोविंद मोकाटे, माजी जिल्हा परिषद सदस्य (कर्डीलेंचे कट्टर विरोधक) वंचित बहुजन आघाडी : अनिल जाधव

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.